# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/09/2023 (सोमवार) सकाळ

---

### गॅस कटरने एटीएम कापून पैशाची चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद
### एकुण २७,३०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक २३/०९/२०२३ रोजी रात्री ०२.३० वा. ते ०२.४५ वा. दरम्यान बुट्टीबोरी परीसरातील ICIC बॅकेचे ATM मशीन मध्ये काही अनोळखी इसमांनी संगनमत करून प्रवेश करून गॅस कटरचा वापर करून ATM मशीनचे समोरील डिस्पेन्सर डोअर व वॉल्ट कापून ATM मशीन मधून एकुण १४,९५,२००/—रू चोरून नेल्याच्या फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे बोरी येथे अप क्र. ७७७/२३ कलम ४५७, ३८०, ३४ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात नमुद गुन्हयाचा समांतर तपास करण्याचे आदेश दिले. त्यावरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी आपल्या अधिपत्याखाली अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथके तयार करून तपासाच्या सुचना दिल्या. सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असतांना तांत्रिक पद्धतीच्या आधारे नमुद गुन्हयातील संशयित आरोपी हे एका पांढऱ्या रंगाच्या सुझुकी स्विफ्ट या चारचाकी वाहनाने येवुन सदर घटना करून बोरखेडी टोल प्लाझा येथुन TS01EM1515 या क्रमांकाने टोल पास केल्याचे दिसुन आले. सदर वाहन क्रमांकाचे वाहन पोर्टलवरून डिटेल काढले असता त्यांनी वापरलेला नंबर चुकीचा असल्याचे दिसुन आले. सदर पथकने महाराष्ट्रातील तेलंगाना येथील टोल प्लाझा चेक करून सदर वाहन आंध्रप्रदेशकडे गेल्याची तांत्रिकरीत्या निष्पन्न करून त्या आधारे नमुद वाहनाचा सतत ८०० किमी पाठलाग करीत पोलीस स्टेशन ढोण जि. नंदीयाल रा. आंध्रप्रदेश परीसरात सापळा रचुन नमुद वाहन थांबविले असता त्यामागे एक कंटेनर संशयितरीत्या थांबुन चारचाकी वाहनातील इसमांना ताब्यात घेत असता कंटेनरमधील ०५ इसमांपैकी ०४ इसम पळुन गेले. पळुन गेलेले ०४ इसमांनी चोरी केलेली रक्कम सोबत घेवुन पळुन गेले. पळुन गेलेल्या चारही इसमांचा शोध स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण करीत आहे. घटनास्थळावर संशयित सुझुकी स्विफ्ट कार मधील ०२ इसम **१) हरेत सिंग रामहंस सिंग वय ३२ वर्ष, रा. खुर्शी पोस्ट जटवारी, ता. छाता जि. मथुरा (उत्तरप्रदेश) २) वसीम अकरम मोहम्मद आझाद, वय २४ वर्ष, रा. धिमरी जि. भरतपूर (राजस्थान) तसेच** तसेच कंटेनरच्या चालकाने त्याचे नाव मोहम्मद मुस्तकीन आस मोहम्मद, वय २९ वर्ष, रा. घसेडा ता. नुह, जि. मेवात (हरीयाणा) यांना ताब्यात घेतले असता त्यांना पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अप. क्र. ७७७/२३ कलम ४५७, ३८०, ३४ भांदवि गुन्हयाचे घटनेसंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी पळुन गेलेले ०४ इसमांसह नमुद गुन्हा केल्याचे सांगितले. पुढे त्यांचे ताब्यातून सदर गुन्हा करतेवेळी वापरलेले पांढऱ्या रंगाच्या सुझुकी स्विफ्ट कार HR-98/L4506 तसेच कंटेनर क्र. RJ-14/GN-4874 व त्यामधुन एमटीम कापणेकरीता लागणारे ऑक्सीजन सिलेंडर, एल.पी.जी. सिलेंडर व इतर साहीत्य जप्त करून एकुण २७,३०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. पळुन गेलेल्या आरोपींचा शोध सुरू असुन सदरचा एटीएम गॅस कटरने कापून पैसे चोरी करण्याचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, आशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, बट्टुलाल पांडे, सहायक फौजदार महेश जाधव, नाना राऊत, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, गजेंद्र चौधरी, राजेंद्र रेवतकर, आशिष भुरे, इक्बाल शेख, मयुर ढेकले, अरविंद भगत, विनोद काळे, पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किनगे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, नितेश पिपरोदे, विपीन गायधने, पोलीस अंमलदार राकेश तालेवार, चालक आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे यांनी पार पाडली.



## सराईत गुन्हेगार प्रमोद राजेंद्र सहानी याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण ची कारवाई)

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणाऱ्या खदान नं ०३ ता. पारशिवनी जि. नागपूर परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार प्रमोद राजेंद्र सहानी वय २४ वर्ष रा. खदान नं ३, कन्हान जि. नागपूर याने पोलीस स्टेशन रामटेक व कन्हान परीसरात मोठ्या प्रमाणात गुन्हे करून निरंतर सक्रीय होता. त्याचे या गून्हेगारी कृत्यामुळे नागरीकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. सदर सराईत अपराधी हा शरीराविरूध्द व मालमत्ते संबंधात गुन्हे करण्यात अग्रेसर असल्याने त्याचे या कृत्यामुळे सामान्य जनतेच्या जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. अश्या या धोकादायक गून्हेगारा विरूध्द नागपुर ग्रामीण पोलीसांनी बरेच वेळा प्रतिबंधक कारवाई केलेली आहे. तसेच त्यांचे विरूध्द दाखल करण्यात आलेल्या गून्हयात त्याला वारंवार अटक सुध्दा करण्यात आली. व त्याचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी या हेतुने त्याला कारागृहातही पाठविण्यात आले. परंतु कारागृहातुन सुटका झाल्यानंतर त्याचेमध्ये कोणतीही सूधारणा झाली नाही. याउलट तो अधिक निडर व दु:साही होत गेला. त्याने साथीदारासह दुखापत पोहचवुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देणे, साथीदारासह जबरी चोरी करून ईच्छापुर्वक दुखापत पोहचविणे, घरफोडी करणे, जबरी चोरी करणे यासारखे गुन्हे करत गेला. त्यामुळे परीसरात राहणाऱ्या नागरीकांमध्ये त्याची प्रचंड दहशत निर्माण झाली. यामुळें त्याचेवर नियंत्रण ठेवुन त्याचेवर प्रभावी कारवाई करणेकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए पोद्दार यांनी ठाणेदाराला कठोर व प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार रामटेकचे ठाणेदार यांनी सदर गुन्हेगाराविरूध्द एमपीडिए कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करून मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना सादर केला. मा. जिल्हाधिकारी यांनी सदर सराईत गुन्हेगाराची वृत्ती व त्याने केलेले गुन्हे तसेच त्यांने कन्हान व रामटेक परीसरात माजविलेली दहशत लक्षात घेता सदर गुन्हेगाराविरूध्द योग्य ती दखल घेवुन त्यास ०१ वर्षाकरीता स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने सराईत गुन्हेगार प्रमोद राजेंद्र सहानी यास दिनांक २४/०९/२०२३ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, श्री. हर्ष ए. पोद्दार, व अपर पोलीस अधीक्षक, डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**